जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
Email-cp.thane.pro@mahapolice.gov.in

'' प्रेस नोट'' **दिनांक : ०४/०७/२०२६**

''दरोडयाच्या गुन्हयातील आरोपीतास अटक करून गुन्हा उघडकिस आणले बाबत,''

''गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी''

----------oooo----------

टारगेट मोबाईल शॉप शिमला पार्क, कौसा, मुंब्रा, ठाणे येथे व दिनांक २८/०६/२०२६ रोजी ०४:१८ ते ०४:४० वा. दरम्यान दामाजी बिल्डींग समोर सार्वजनीक रस्त्यावर यातील आरोपीतांनी फिर्यादीस फोनवर जिवे ठार मारण्याची धमकी देवुन यातील आरोपीतांनी आर्थीक फायद करीता आपसात कट रचुन पैशांसाठी फिर्यादी यांना वॉट्सॲप व स्नॅपचॅटव्दारे सतत फोन केले तसेच मारहान करून चॉपरचा धाक दाखवुन फिर्यादी कडुन ५००० रू किंमतीचा मोबाईल रोख रक्कम तसेच गाडीची तोडफोड करून गाडीतुन रोख रक्कम ३ लाख रूपये चोरून नेले असे एकुण ३,३१,००० रूपये किंमतीच्या चिज वस्तु जोर जबरदस्तीने व लबाडीने चोरी केले म्हणुन मुंब्रा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नंबर ११२२/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१०(२), ३१२, ३०८(३),३०८(४), ३०८(५), ३०३(२), ३२४(४)(५), ११५(२), ३५१(२), ३५१(३),३५२,६१(२) सह शस्त्र अधि. कलम ४,२५ सह म.पो.अधि. ३७(१),१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास करून यातील आरोपीतांना अटक करण्याच्या वरिष्ठांकडुन सुचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने तपास करीत असताना गुन्हे शाखा घटक ०१ चे पो.हवा./७००३ धनंजय आहेर यांना यातील आरोपीताबाबत मिळालेल्या गोपनिय माहीती वरून पथकासह ठाकुरपाडा, मुंब्रा येथे सापळा रचुन आरोपीत नामे शब्बीर कासम अली शेख, वय २१ वर्षे, राह. ए/२०२, चांदणी अपार्टमेंट, दर्गा रोड, अमृतनगर, मुंब्रा, ठाणे. यास दिनांक ०४/०७/२०२६ रोजी ताब्यात घेण्यात आले असुन त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. यातील इतर आरोपीतांचा शोध घेत आहोत.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री अमरसिंह जाधव, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे श्री. शेखर बागडे यांची सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सचिन गायकवाड, पो.उप निरीक्षक प्रकाश शिरसाठ, श्रे. पो.उप निरीक्षक दिपक जाधव, पोहवा/४१७४ संदिप महाडिक, पो.हवा./२१६३ शब्बीर फरास, पोहवा/७००३ धनंजय आहेर, पोहवा/६८८३ मुकुंद आव्हाड, मपोहवा/ दिपाली जाधव, चापोहवा/ शशिकांत सावंत, पोशि/२७५५ अमोल ढावरे, पोशि/८०६६ प्रशांत लवटे, पोशि/८२४३ सागर सुरळकर यांनी केली आहे.